मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३10 ■ बुधवार, २२ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# कॉक्रोच चिरडण्या साठी अचाट शक्तीचा प्रयोग

## कॉकरोच जनता पार्टीच्या 'संसद मार्च'ला हिंसक वळण

**दिल्ली :** 'कॉकरोच जनता पार्टी'च्या 'संसद मार्च'ला हिंसक वळण मिळाल्याचे वृत्त आहे. नीट पेपर लीक प्रकरणी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन आक्रमक झाले. आंदोलकांनी कॅनॉट प्लेससह अनेक ठिकाणी तोडफोड केली. पोलिसांवर दगडफेक. संसद भवनाजवळ पोहोचल्यानंतर पोलिसांनी अश्रुधूराच्या नळकांडया फोडल्या तसेच लाठीचार्ज करून जमावाला पांगवले.




संसदेला घेराव घालण्याचा प्रयत्न

अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडल्या

कॅनॉट प्लेसमध्ये दगडफेक

पोलिसांचा लाठीचार्ज

वाहनांची तोडफोड

आंदोलकांना ताब्यात घेतले

हजारोंच्या संख्येने युवकांचा सहभाग

## युवा आंदोलन.... क्षणचित्रे

# ईपीआर फाउंडेशन तर्फे जनजागृती अभियान

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : न्यू इंग्लिश स्कूल खाडपोली येथे ईपीआर फाउंडेशन संस्थापक अपर्णा शहा संस्थापीत "खा-खेळा-वाचा" जनजागृती अभियानांतर्गत सदिच्छा भेट आयोजित करण्यात आली. भारताला निरोगी आणि आनंदी राष्ट्र बनवणे या हेतूने विद्यार्थ्यांना "खा विचारपूर्वक, खेळा उत्साहपूर्वक आणि वाचा उत्स्फूर्तपणे" या संकल्पनेविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात मुलांना योग्य आहाराचे हत्त्व, खेळाचे फायदे आणि वाचनाची सवय याबाबत माहिती देण्यात आली. तसेच कलाकृती आणि



पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आकर्षक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाचा आनंद लुटला. शिक्षकांनी देखील कार्यक्रमाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला, काळाचा आणि विद्यार्थ्यांचा हा अत्यंत गरजेचा आणि महत्वाचा विषय आहे असे त्यांनी नमूद केले.

# कळंबोली पुलावर लोखंडी होर्डिंग कोसळले; सुदैवाने जीवितहानी टळली

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** कळंबोली सर्कल ते मुंब्रा रोडवरील कळंबोली पुलाच्या सुरुवातीला उभारलेले एक मोठे लोखंडी होर्डिंग मंगळवारी अचानक कोसळल्याने काही काळ वाहतुकीत अडथळा निर्माण झाला. मात्र, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झाली नाही.प्रत्यक्षदर्शी ट्रक चालक आणि स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, होर्डिंग अचानक रस्त्यावर कोसळल्याने वाहनचालकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने त्या वेळी होर्डिंगच्या खाली कोणतेही वाहन अथवा नागरिक नसल्याने मोठी दुर्घटना टळली.घटनेची माहिती मिळताच पोलीस, संबंधित प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणेचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रस्त्यावर पडलेले लोखंडी स्ट्रक्चर आणि इतर साहित्य हटविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. त्यामुळे काही काळ वाहतुकीचा वेग मंदावला असला, तरी प्रशासनाच्या तत्परतेमुळे वाहतूक सुरळीत करण्याचे काम वेगाने सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.या घटनेनंतर पुलारील होर्डिंगच्या सुरक्षिततेबाबत



प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अशा संरचनांची तातडीने तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ओझरसाठी २१.२५ कोटींची विकासकामे; ६१ कामांचे भूमिपूजन उत्साहात

**ओझर : राकेश शर्मा**

ओझर नगरपरिषद हद्दीतील रस्ते काँक्रिटीकरणासह विविध विकासकामांसाठी सुमारे २१ कोटी २५ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली असून, ६१ विकासकामांचे भूमिपूजन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते तांबट लेन येथे करण्यात आले.यावेळी बोलताना मंत्री महाजन म्हणाले की, ओझरच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून आवश्यक निधी कमी पडू दिला जाणार नाही. तांबट लेन येथील शहरांतर्गत रस्त्याच्या काँक्रिटीकरणासह पहिल्या टप्प्यातील कामांना प्रारंभ झाला असून भविष्यातही विकासकामांना गती दिली जाईल.ावेळी ओझरमधील कचरा व्यवस्थापनासाठी सय्यद पिंपरी येथे जागा उपलब्ध करून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न, बाणगंगा नदी संरक्षण भिंत, प्रभुधाम मंदिर ते नाशिक विमानतळ जोडणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण तसेच दहावा मैल परिसराचे सुशोभीकरण ही कामेही लवकरच हाती घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार माई कदम होत्या. यावेळी नगराध्यक्ष अनिता घेगडमल, भाजप जिल्हाध्यक्ष यतीन कदम, प्रांताधिकारी शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, मुख्याधिकारी किरण देशमुख यांच्यासह विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## मंत्रिमंडळ निर्णय एकूण निर्णय - 5

**दैनिक युवक आधार**
**मुंबईपण प्रतिनिधी**

(नियोजन विभाग) *राज्यातील 177 आकांक्षित तालुक्यांमध्ये एक वर्षाकरिता आकांक्षित तालुका कार्यक्रम* राज्यातील 177 आकांक्षित तालुक्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर सन 2026-27 साठी आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नीति आयोगाने देशातील दुर्लक्षित व मागासलेल्या 112 जिल्ह्यांमध्ये आकांक्षित जिल्हा कार्यक्रम व 500 अल्प विकसित तालुक्यांमध्ये आकांक्षित तालुका कार्यक्रम सुरू केलेला आहे. त्यामध्ये राज्यातील 4 जिल्हे व 27 तालुक्यांचा समावेश आहे. या तालुक्यांचे आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषि आणि संलग्न सेवा, मूलभूत पायाभूत सुविधा, सामाजिक विकास क्षेत्रातील 39 निर्देशांक यांच्या आधारे कामगिरीचे मूल्यमापन केले जाते व त्यासाठी आयोगाकडून विशेष निधी दिला जातो. याच धर्तीवर महाराष्ट्राने संतुलित, सर्वांगीण व गतिमान विकासासाठी आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमाचा विस्तार केला असून त्यांमध्ये गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव, वाशिम, हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या 10 जिल्ह्यांची व एकूण 177 तालुक्यांची विस्तारित आकांक्षित जिल्हे व तालुके म्हणून निवड केली आहे. या नव्याने निवड करण्यात आलेल्या 177 आकांक्षित तालुक्यांमध्ये सन 2026-27 साठी आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली. या तालुक्यांना या वर्षासाठी 5 कोटी रूपयांचा निधी देण्यात येईल. या वर्षात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना सन 2027-28 मध्ये अतिरिक्त प्रोत्साहन निधी देण्यात येईल. हा निधी पुरस्कार स्वरूपात पहिल्या पुरस्कारासाठी 10 कोटी, दुसऱ्या पुरस्कारासाठी 8 कोटी, तिसरा-6 कोटी, चौथा-4 कोटी आणि पाचवा पुरस्कार 2 कोटी रूपयांचा असेल. याशिवाय सर्व क्षेत्रातील एकत्रित कामगिरीच्या आधारे पुरस्कार दिला जाईल. यात पहिला पुरस्कार 21 कोटी, दुसरा पुरस्कार-15 कोटी आणि तिसरा पुरस्कार-11 कोटी रूपयांचा असेल. या तालुक्यांच्या मूल्यांकनासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय अशा संनियंत्रण समित्या स्थापन केल्या जातील.

**(कृषि विभाग)**

**नागपूरच्या काटोल येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय**

नागपूर जिल्ह्यातील काटोल येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्याशी संलग्न शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नागपूर व अमरावती विगातील 11 जिल्ह्यांमध्ये संत्रा, मोसंबी, आंबा, लिंबू, पेरू इत्यादी व मुख्य फळ पिकाव्यतिरिक्त कमी पाण्यावर तग धरणारी आवळा, सिताफळ या फळपिकांचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर नागपूर जिल्ह्यातील फळे, भाजीपाला व फुलशेतीची विविधता बघता उद्यानविद्या महाविद्यालयाची आवश्यकता आहे. या महाविद्यालयामध्ये फळे, भाजीपाला, फुले तसेच, प्रक्रिया व मूल्यवर्धन या संबंधीच्या अभ्यासक्रमांचा समावेश असल्याने त्यासंबंधीच्या अभ्यास व संशोधनाला चालना मिळणार आहे. रवर्षी या महाविद्यालयात 120 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. या महाविद्यालयासाठी शिक्षकवर्गीय 29 पदे आणि शिक्षकेतर नियमित 22 पदे अशी एकूण 51 नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्याचबरोबर शिक्षकवर्गीय (गट अ) (05) आणि शिक्षकेतर (गट क) (08) व (गट ड) (22) ची पदे आवश्यकतेनुसार कंत्राटी स्वरुपात भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पदांसाठी आवश्यक वेतन व अनुषंगिक खर्चासाठी 122 कोटी 32 लाख रूपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

**(महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)**

**एनडीआरएफला पुणे जिल्ह्यातील मौजे सदुंबरे येथे तीन हेक्टर जमीन**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल-एनडीआरएफला पुणे जिल्ह्यातील मौजे सदुंबरे (ता.मावळ) येथील तीन हेक्टर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मौजे सदुंबरे येथील गायरानातील तीन हेक्टर जमीन एनडीआरएफला बाजारभावाने देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यावर या संस्थेने जनहित तथा राष्ट्रीय महत्त्व या कारणास्तव संस्थेस ही जमीन विनामूल्य मिळावी, अशी मागणी केली होती. या जमिनीवर एनडीआरएफचा कायमस्वरूपी तळ उभारण्यात येणार आहे. जिथे आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध प्रशिक्षणांसह, विविध स्वरूपाच्या आपत्तींवर मात करण्यासाठीची कृतीदले तैनात राहणार आहेत. यामुळे राज्यात आपत्कालीन स्थितीत उपाययोजना करता येणार. या दृष्टीने देशातील एकमेव अशा समर्पित नागरी दल म्हणून एनडीआरएफला ही जागा विनामूल्य भोगवटादार वर्ग-2 म्हणून मान्यता देण्यात येणार आहे.

**(महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)**

***भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूर येथील जमीन भाडेपट्ट्यावरील मुद्रांक शुल्क माफ***

मोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूरमधील सुभाष रोड जागेच्या भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ ही सार्वजनिक धर्मादाय संस्था आहे. ही संस्था राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक प्रबोधन, ग्रामविकास, व्यसनमुक्ती, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रभक्ती तसेच विविध जनकल्याणकारी उपक्रम राबवीत असते. या संस्थेला नागपूर मधील सुभाष रोड येथील 18 हजार 340 चौ.फूट जागा शासनाने 1954 मध्ये भाडेपट्ट्यावर उपलब्ध करून दिलेली आहे. या संस्थेने विनंती केल्यानुसार भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणावरील मुद्रांक शुल्क लोकहितास्तव माफ करण्याचा प्रस्ताव होता. त्यास आज मान्यता देण्यात आली.

(सामान्य प्रशासन विभाग)

**लोक आयुक्त कार्यालयातील 143 पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता**

लोक आयुक्त कार्यालयातील 143 पदांच्या सुधारित आकृतीबंधास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

लोक आयुक्त व उपलोक आयुक्त कार्यालयाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या दोन्ही कार्यालयांसाठी यापूर्वी 87 पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला होता. आता राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम 2023 लागू केला आहे. या अधिनियमानुसार लोक आयुक्त संस्थेतील सदस्यांमध्ये वाढ झाली असून त्यांच्या अधिकार क्षेत्रातही वाढ झाली आहे. त्यामुळे या कार्यालयाला प्रभावी अंमलबजावणीसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण झाली. त्यानुसार सध्याची मंजूर पदे 87 अधिकची 56 पदे (31 नियमित, 23 बाह्ययंत्रणेद्वारे आणि 2 माहिती तंत्रज्ञान कर्मचारी) अशा एकूण 143 पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली.


# गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार योजनेने वीरगव्हाणचा कायापालट

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून जलसंधारणाला नवी दिशा; ४ हजार क्विंटल गव्हाचे विक्रमी उत्पादन

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे**
**तालुका प्रतिनिधी अमरावती**

राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या 'गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार' योजनेमुळे तिवसा तालुक्यातील भिवापूर ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या वीरगव्हाण गावाचा जलसंधारण आणि शेती विकासाचा चेहरामोहरा बदलला आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून तलावाची दुरुस्ती व गाळमुक्त धरण योजनेअंतर्गत खोलीकरणाची कामे पूर्ण झाल्याने गावातील पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला असून शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध





झाला आह.

जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्री बावनकुळे यांनी विशेष लक्ष देऊन जिल्हा वार्षिक योजनेतून तलावाच्या दुरुस्तासाठा ानधा उपलब्ध करून दिला. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी सुनील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या समन्वयातून हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला.

तलावाचे खोलीकरण, पाळ व सांडव्याची दुरुस्ती यामुळे जलसाठा मोठ्या प्रमाणात वाढला असून परिसरातील १०० ते १५० शेतकऱ्यांना सिंचनासाठी कायमस्वरूपी पाण्याचा आधार मिळाला आहे. या प्रकल्पामुळे सुमारे २०० हेक्टर शेती सिंचनाखाली आली असून शेती उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली आहे.

**ठळक बाबी**

- जिल्हा वार्षिक योजनेतून तलावाची दुरुस्ती पूर्ण.
- तलावाची जलधारण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली.
- सुमारे २०० हेक्टर शेतीला सिंचनाचा लाभ.
- १०० ते १५० शेतकऱ्यांना कायमस्वरूपी पाण्याचा आधार.
- तलावातील सुपीक गाळ शेतात टाकल्याने जमिनीची सुपीकता व भूजल पातळी वाढली.
- यंदाच्या रब्बी हंगामात ४ हजार क्विंटल गव्हाचे विक्रमी उत्पादन.

वीरगव्हाण गावातील हा जलसंधारण प्रकल्प जिल्ह्यातील इतर गावांसाठी आदर्श ठरत असून, ग्रामीण भागातील जलसुरक्षा आणि शेती विकासासाठी अशा प्रकारचे प्रकल्प व्यापक प्रमाणात राबविल्यास दुष्काळी परिस्थितीवर प्रभावी मात करून शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण साध्य होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# विद्यार्थी आरोग्य शिबीर वह्या वाटप, गुणवंताचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी आरोग्य शिबीर वह्या वाटप, गुणवंताचा सत्कार शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने करण्यात आला. यावेळी खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे, दलित पँथरचे प्रदेशाध्यक्ष सुखदेव सोनवणे, खेड पंचायत समितीच्या सभापती विद्याताई मोहिते, महावितरणचे कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी, संस्थेचे अध्यक्ष व लेखक अशोकराव टाव्हरे, राजगुरुनगरचे नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता मंचरे, वाफगाव प्राथमिक केंद्र वाफगावच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मेघना जाधव,खेड ता.भाजपचे उपाध्यक्ष दिलीप माशेरे, कनेरसरच्या सरपंच सुनीता केदारी, कुलस्वामिनी साहित्य परिषदेच्या कार्यवाह सुरेखा टाव्हरे, खेड. ता.ख.वि.संघाचे संचालक संतोष गोरडे, ॲड.सुहास दौंडकर, प्रा.बाळासाहेब माशेरे, उद्योजक उमेश दौंडकर. भाऊसाहेब फुके,



ॲड समीर गोडसे, नीलेश घोडके, समाजसेवक बाबा हजारे, पवना हॉस्पीटलचे व्यवस्थापक भारत, दांगट आदी मान्यवर कनेरसर ता.खेड.जि.पुणे येथे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अशोकराव टाव्हरे यांनी मुख्यमंत्र्याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विधायक उपक्रम राबवित असताना पवना हॉस्पीटल, प्राथमिक आरोग्य केंद्र वाफगाव व स्टाफ यांचे आभार मानले.तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी सेवाभावी उपक्रम राबविल्याबद्दल संस्थेचे कौतुक केले.

## मुख्य संपादक शेख आरीफ निमटेककर यांना दिल्ली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल फेलोशिप पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**



**नांदेड :** जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील निमटेक येथील महाराष्ट्र 24 मराठी न्यूजचे मुख्य संपादक शेख आरीफ निमटेककर यांची भारतीय दलित साहित्य अकादमी, नवी दिल्ली यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या "डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल फेलोशिप अवॉर्ड – 2026" साठी निवड करण्यात आली आहे. अकादमीने पाठविलेल्या पत्रानुसार हा प्रतिष्ठेचा पुरस्कार 12 ते 13 डिसेंबर 2026 रोजी नवी दिल्ली येथे आयोजित राष्ट्रीय अधिवेशनात प्रदान करण्यात येणार आहे. भारतीय दलित साहित्य अकादमी विविध क्षेत्रातील साहित्यिक, पत्रकार, समाजसेवक आणि मान्यवरांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल दरवर्षी सन्मानित करते. या निवडीबद्दल शेख आरीफ निमटेककर यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याची ही दखल असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल महाराष्ट्रातील अनेक साहित्याने त्यांचे अभिनंदन केलेले आहे

## जालन्यात आनंदराज आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली विराट मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**जालना (अशोक ठोके)** अनुसूचित जातीमधील अ, ब, क, ड उपवर्गीकरणाच्या विरोधात रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आज जालना शहरात विराट मोर्चा काढण्यात आला. भर पावसातही या मोर्चाला लाखो आंबेडकरी जनतेचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून या ऐतिहासिक मोर्चाला सुरुवात करण्यात आली. यावेळी ढोल-ताशांच्या गजरात आणि 'जय भीम'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.हातात निळे झेंडे आणि उपवर्गीकरण विरोधी फलक घेऊन हजारो कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते. पावसाची संततधार सुरू असतानाही एकही कार्यकर्ता जागचा हलला नाही, यामुळे या मोर्चाने प्रशासनाचेही लक्ष वेधून घेतले.हा मोर्चा मस्तगड येथून निघून मुख्य मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे पोहोचला. तेथे या मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले.

## भटक्या प्राण्यांबाबत संवेदनशील भूमिका घ्यावी, नगराध्यक्षा भावना घाणेकर .

### उरणमध्ये भटक्या श्वानांच्या निर्बीजीकरण व लसीकरण मोहिमेला प्रारंभ

**दैनिक युवक आधार/**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण शहर व परिसरातील भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळविण्यासह नागरिकांची सुरक्षितता आणि प्राणी कल्याण यांचा समतोल साधण्यासाठी उरण नगरपरिषदेने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. 'युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी' या संस्थेच्या माध्यमातून आजपासून भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण (Animal Birth Control - ABC) आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला अधिकृत सुरुवात करण्यात आली.




या मोहिमेच्या प्रारंभी नगरपरिषद पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून तज्ज्ञ पशुवैद्यकीय पथकाकडून निर्बीजीकरण व लसीकरणाच्या संपूर्ण प्रक्रियेची माहिती घेतली. या उपक्रमामागील उद्दिष्ट, वैज्ञानिक पद्धती आणि प्राणी कल्याणाचे महत्त्व याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याचबरोबर, उरणमधील बोरी (कोंडवाडा) परिसरात भटक्या श्वानांसाठी अत्याधुनिक डॉग शेल्टर उभारण्याचे कामही वेगाने सुरू असून, ते लवकरच पूर्णत्वास नेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

भटक्या श्वानांची अनियंत्रित वाढ रोखणे, रेबीजसारख्या संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण मिळविणे तसेच नागरिक, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश उरण नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले की, भटक्या श्वानांचे नियंत्रण आणि त्यांच्या संरक्षणाचा समतोल राखत सुरक्षित, स्वच्छ आणि 'ॲनिमल फ्रेंडली' उरण घडविण्यासाठी ही मोहीम सातत्याने राबविण्यात येणार आहे. नागरिकांनीही या मोहिमेला सहकार्य करून भटक्या प्राण्यांबाबत संवेदनशील भूमिका घ्यावी, असे आवाहन नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी केले आहे.

# वातावरण बदलातील आव्हानांना स्वीकारुन

## कृषी क्षेत्रातील प्रगतीसाठी शासन कटिबध्द- जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू**
**संपादक नागपूर विभाग**

नागपूर,दि. 17 : कृषी क्षेत्रात अधिकाधिक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकरी ते थेट ग्राहक अशी उत्पादन व विक्री श्रृंखला जोपर्यंत सक्षम होणार नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या आर्थिक लाभात अधिक वृध्दी दूरापास्त आहे. वातावरणातील अनेक बदलांची आव्हाने स्वीकारत अधिक परिपक्व झालेल्या शेतकरी बांधवांच्या अनुभवांची जोड नवीन उच्च कृषी तंत्रज्ञानाला मिळाल्यास नागपूर जिल्ह्यातील शेतकरी फायदेशीर शेतीचा नवा मार्ग विकसीत करतील असा विश्वास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केला.




शेतकऱ्यांच्या अनुभवातील व ज्यांनी विविध प्रगतशील प्रयोग आपल्या शेतीत केले अशा शेतकऱ्यांच्या अनुभवांचे आदानप्रदान व्हावे व शासनस्तरावर जिल्ह्याच्या कृषी क्षेत्राला व्यापक विकास नियोजनाची जोड देता यावी याउद्देशाने येथील हॉटेल सेंटर पॉईंट येथे आयोजित परिसंवादात ते बोलत होते. यावेळी आत्माच्या प्रकल्प संचालिका डॉ. अर्चना कडू, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र मनोहरे, उपसंचालक श्रीमती पल्लवी तलमले व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमास संपूर्ण जिल्ह्यातून आमंत्रित करण्यात आलेले जिल्ह्यातील 130 हुन अधिक प्रगतिशील शेतकरी, महिला शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक सहभागी झाले होते.

नागपूर जिल्ह्यात धान, सोयाबीन, तूर, कापूस, संत्रा व इतर फळपिके प्रामुख्याने होतात. यात आंतरपिकासह पीक पध्दतीमध्ये बदलाची शक्यता व संधी, वातावरण बदलामुळे किड रोगाचे व्यवस्थापन, विविध अडचणी, आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान व नियोजन, शेतकरी उत्पादक कंपन्या, सेंद्रीय शेती, महिला बचत गटांच्या माध्यमातून विविध कृषी उत्पादनांचा कृषी व्यवसाय व मनुष्यबळ उपलब्धी याबाबत शेतकऱ्यांना वेळोवेळी विविध अडचणींना सामोरे जावे लागते. यातून मार्ग काढण्यासाठी शासनाच्या विविध योजना व पात्र लाभार्थ्यांची निवड आणि व्यवस्थापन यांचा सुवर्णमध्ये साध्य करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. प्रायोगिक तत्वावर व नाविन्यपूर्ण काही कल्पना असल्यास त्या जिल्हा वार्षिक नियोजन आराखड्यातून करण्याबाबत प्रयत्न करु, असे ते म्हणाले.

या परिसंवादात वन क्षेत्राच्या जवळ असलेल्या शेतीतील पिकाच्या संरक्षणासाठी लेझर टेक्नॉलाजी व स्मार्ट तंत्रज्ञान, फळबागेसाठी छाटणी करीता नवीन सुलभ प्रुनिंग मशिन, संत्र्याचे ग्रीडींग व पॅकेजिंग सेंटर, लिफ टेस्टींग लॅब, बुम स्प्रेअर, ठिबक सिंचन प्रणालीसाठी ॲटोमायझेशन याला अधिकाधिक अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतही या परिसंवादात चर्चा झाली. याचबरोबर बॅटरीवर चालणारे पॉवर टिलर, सोलर ड्रायर, चियासीड व मोहरी यांसारख्या पिकांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे हार्वेस्टर, भात पिकाकरीता डिएसआर यंत्र, भात लावणी यंत्र उपलब्ध करून देणे, सोयाबीन पिकाकरीता बीबीएफ आणि बीज प्रक्रिया यंत्र, कापूस पिकाकरीता कॉटन ग्रेडर आदी तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण आंदोलन निर्धार सभा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे**

अनुसूचित जाती आरक्षणाचे ऊपवर्गीकरण लवकर करावे या करीता आझाद मैदान मुंबई येथे २९ सप्टेंबर २०२६ रोजी होत असलेल्या आंदोलनाचा आढावा घेण्यासाठी सकल मातंग समाजाची निर्धार बैठक शेगाव बुलढाणा येथे पार पडली. या संभाव्य आंदोलनाची पुढील दिशा कशी असेल याबाबत




राज्य समन्वयक बाबूराव मुखेडकर यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे माहिती दिली.

बैठकीचे अध्यक्षपद निमंत्रक विजयभाऊ आंभोरे यांनी भूषवले. बैठकीस राज्य समन्वयक बाबूराव मुखेडकर, सुदाम धुपे, पंडित सूर्यवंशी, कैलाश डाखोरे,ॲडव्होकेट राम चव्हाण,परिमल कांबळे, रणधीर कांबळे, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास दादा खंदारे, ल. सा . क. म. चे विश्वस्त अध्यक्ष ऊपाडे, सचिव सुभाष तोंडारकर, प्रा. अंबादास सकट, ए टी अवचार, प्रदेश अध्यक्ष प्रा संजय गायकवाड, अविनाश बागवे मातंग एकता आंदोलन प्रमुख, सुनिल बावकर, दयानंद आडागळे,विलास साबळे ,संजय कठाळे ,संजय उबाळे जी, विनोद जोगदंड देवीलाल अवचार, ॲड नरसिंग सूर्यवंशी, मंदाकिनी चव्हाण, संजय कठाले,आणि डॉ. चंदन शिवे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

विभागीय बैठक, जिल्हा निहाय, तालुका निहाय बैठका घेत ऑगस्ट महिन्यात साहीत्यसम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती कार्यक्रमात अंदोलनाविषयी जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे बाबूराव मुखेडकर यांनी यावेळी सांगितले..

## स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त लोणीकंद येथे शाळेतील विद्यार्थ्यांना युवा नेते जयेश दादा कंद यांच्यातर्फे छत्र्यांचे वाटप

**राजेभाऊ शिकारे**
**हवेली तालुका प्रतिनिधी**

आज स्वर्गीय आदरणीय दादांच्या प्रथम जयंतीनिमित्त एक छोटासा सेवाभावी उपक्रम आयोजित करण्यात आला. दादांनी माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना दिलेले संस्कार आणि शिकवण आजही प्रेरणा देतात – "समाजाने आपल्याला खूप काही दिले आहे, त्यामुळे आपणही समाजाला काहीतरी दिले पाहिजे." हाच विचार मनात ठेवून आज लोणीकंद जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना पावसाळ्यात शाळेत ये-जा करताना दिलासा मिळावा या उद्देशाने छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपस्थित राहून स्वर्गीय आदरणीय दादांच्या स्मृतींना अभिवादन करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि उपस्थित नागरिकांचे मनःपूर्वक आभार. स्वर्गीय आदरणीय दादांच्या विचारांचा आणि सेवाभावी कार्याचा वारसा पुढे नेण्याचा आमचा संकल्प कायम राहील.



## आंदोलन चिरडण्यात पुरुषार्थ नाही; केंद्र सरकारवर राज ठाकरेंचा हल्लाबोल

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी**

: महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करण्याच्या कारवाईवर, विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरील पोलिस लाठीचार्जावर आणि NEET परीक्षा प्रकरणावरून केंद्र सरकारवर तीव्र टीका केली आहे. सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या सविस्तर भूमिकेत त्यांनी सरकारने आंदोलकांशी दडपशाहीचे धोरण स्वीकारल्याचा आरोप केला.

राज ठाकरे म्हणाले की, १८ जुलै रोजी सोनम वांगचुक यांना ज्या पद्धतीने जबरदस्तीने रुग्णालयात हलवण्यात आले, त्यावरून सरकारला त्यांच्या आरोग्याची नव्हे तर आंदोलन दडपण्याचीच अधिक चिंता होती, असे दिसते. त्यानंतर विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जाचाही त्यांनी निषेध करत सरकारने संवादाऐवजी बळाचा वापर केल्याची टीका केली.

NEET परीक्षा आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीबाबत बोलताना ठाकरे म्हणाले की, "विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांपेक्षा सरकारचा अहंकार मोठा असू शकत नाही. परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणणे आणि जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. अकार्यक्षम मंत्र्यांचा राजीनामा व्हायलाच हवा."

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही त्यांनी आवाहन केले. ""परीक्षा पे चर्चा' करता, तर आता विद्यार्थ्यांशीही चर्चा करा. देशातील विद्यार्थ्यांचा आक्रोश आणि त्यांच्या मागण्या समजून घ्या," असे ते म्हणाले.

राज ठाकरे यांनी हे आंदोलन केवळ एका परीक्षेपुरते मर्यादित नसल्याचे सांगत महागाई, बेरोजगारी, पर्यावरण, विकासाच्या नावाखाली होणारे बदल आणि सर्वसामान्यांतील वाढता असंतोष या अनेक प्रश्नांचा हा उद्रेक असल्याचे म्हटले. आंदोलक विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या धैर्याचे कौतुक करत त्यांनी श्रीलंका, अरब स्प्रिंग आणि जयप्रकाश नारायण यांच्या विद्यार्थी आंदोलनांचा संदर्भही दिला.

मनसेने सुरुवातीपासूनच NEET परीक्षेच्या विद्यमान पद्धतीला विरोध केला होता, अशी आठवण करून देत ठाकरे म्हणाले की, "केंद्राने विनाकारण जुन्या परीक्षा पद्धतीत हस्तक्षेप केला. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही, हेच यावरून दिसते."

शेवटी त्यांनी सरकारला संवादाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करत म्हटले, "आंदोलन चिरडण्यात पुरुषार्थ नसतो. आंदोलन होऊ न देण्यात आणि झालेच तर सामंजस्याने सोडवण्यातच व्यवस्थेचा मोठेपणा असतो."

## सोनम वांगचुक प्रकरणी समता सैनिक दलाचे राष्ट्रपतींना निवेदन

### लोकशाही हक्कांचे संरक्षण, पेपर लीक व विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** भंडारा-सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण अभ्यासक सोनम वांगचुक यांच्यावरील कारवाईच्या निषेधार्थ समता सैनिक दलाच्या वतीने भारताच्या राष्ट्रपतींना निवेदन सादर करण्यात आले. लोकशाही हक्कांचे संरक्षण, शांततापूर्ण आंदोलनावरील कारवाईची निष्पक्ष चौकशी तसेच कथित पेपर लीक प्रकरण आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार प्रदान करते. सोनम वांगचुक यांनी नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे कथित पेपर लीक प्रकरण, विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांची चौकशी आणि शिक्षण व्यवस्थेत उत्तरदायित्व निश्चित करण्याच्या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले होते. मात्र, त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करण्याऐवजी दिल्ली



पोलिसांनी त्यांना आंदोलनस्थळावरून रुग्णालयात हलविल्याचा आरोप करण्यात आला आहे.

समता सैनिक दलाने राष्ट्रपतींकडे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच आंदोलनकर्त्यांवरील कारवाईची घटनात्मक व कायदेशीर समीक्षा, कथित पेपर लीक प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई, विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांची सखोल चौकशी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

चौकशीत शिक्षण मंत्रालय अथवा संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी सिद्ध झाल्यास त्यांच्यावर आवश्यक कारवाई करण्यात यावी, सरकारने आंदोलनकर्त्यांशी सन्मानपूर्वक संवाद साधावा, शांततापूर्ण आंदोलनाच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करावे आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

समता सैनिक दलाचे रोशन फुले (तालुकाप्रमुख) यांनी राष्ट्रपतींनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून लोकशाही मूल्यांचे रक्षण करावे, अशी मागणी केली आहे

निवेदन देतेवेळी रोशन फुले, खुशाल बोरकर, युवराज सुखदेवे, वनमाला सुखदेवे, गीता जांभूळकर, माधुरी जांभूळकर, सलमा मेश्राम, मैपाल सूर्यवंशी, सौरभ नंदेश्वर, राहुल राऊत, कृष्णा सूर्यवंशी, सुदर्शन रामटेके, कन्हैयालाल जांभूळकर, प्रल्हाद सूर्यवंशी, रोशन सोनटक्के, वैभव वैद्य, झकास फुल्लुके आणि इतर सहकारी उपस्थित होते.

## आकोटचे कवी देवराव तेलगोटे 'काव्यरत्न' पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी:-** अखंडित कल्याणकारी बहुउद्देशीय शिक्षण व विकासकार्य संस्था, लातूर यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय साहित्य संमेलन आणि भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात आकोट येथील प्रसिद्ध कवी देवराव दौलतराव तेलगोटे यांना साहित्य क्षेत्रातील अत्यंत मानाचा आणि मोलाचा 'काव्यरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

हा भव्य सोहळा रविवार, दिनांक १९ जुलै २०२६ रोजी कात्रज, पुणे येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान साई हॉस्पिटल, पुणे येथील संचालक डॉ. सुनील जगताप यांनी भूषवले, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध साहित्यिक प्रा. भनगे सर उपस्थित होते. प्रा. भनगे सर यांच्या हस्ते कवी देवराव तेलगोटे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या संमेलनात महाराष्ट्रातील इतरही दिग्गज साहित्यिकांचा गौरव करण्यात आला. नांदेड येथील प्रसिद्ध साहित्यिक प्रा. अशोक जि. कुबडे सर यांना त्यांच्या 'गोंडर' या कादंबरीबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले, तसेच प्रा. शरदचंद्र काकडे देशमुख सर यांचाही या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

कवी देवराव तेलगोटे यांना काव्यरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल आकोटसह संपूर्ण साहित्य वर्तुळातून आणि मित्र परिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनाला सेलूकरांचा पाठिंबा!

**दैनिक युवक आधार**
**सेलू/प्रतिनिधी**

शिवाजी पवार नवी दिल्ली येथील जंतर-मंतरवर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या शांततापूर्ण आंदोलनाला पाठिंबा दर्शवत सेलू शहरातील नागरिकांच्या वतीने राष्ट्रपतींना उद्देशून तहसीलदारांमार्फत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचा आणि आपली भूमिका मांडण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे आंदोलनकर्त्यांच्या आरोग्याची योग्य ती काळजी घेऊन त्यांच्या मागण्यांबाबत केंद्र शासनाने



संवेदनशील व सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच राष्ट्रपतींनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना द्याव्यात आणि आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी विनंतीही निवेदनाद्वारे करण्यात आली ।शिवाय, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, तसेच NEET पेपरफुटी प्रकरणामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली जंतर-मंतरवरील लाठीहल्ल्याचा निषेध यावेळी दिल्लीतील जंतर-मंतर ते संसद भवन या मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याचा तीव्र निषेधही व्यक्त करण्यात आला. आंदोलनकर्त्यांवर करण्यात आलेल्या कारवाईबाबत संताप व्यक्त करत अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, अशी मागणी करण्यात आली. निवेदनातील मागण्या तातडीने मान्य न झाल्यास सेलू शहरातही लोकशाही मार्गाने जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.। निवेदनावर अशोक अंभोरे, विनोद तरटे, ऋषभ अंभोरे, पांडुरंग कदम, विनोद धापसे, गुलाबराव खेडेकर, जावेद पठाण, शेख साजिद, इरफान पठाण, राजिक कुरेशी, पंजाबराव पोळ, अरुण ताठे, विष्णू नाईकनवरे, अविनाश मोगल, प्रशांत भाले, अक्षय साळवे, आठवे, शिवाजी पवार, विशाल जाधव, आमिर पठाण,सुदर्शन काष्टे, कैलास लाटे, दिलीपराव शेवाळे, प्रसाद काष्टे, विष्णू खेडेकर, राजू सहजराव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आ. विनोद अग्रवालांच्या प्रयत्नांना यश; ३४ वर्गखोल्यांना मंजुरी

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड**

**गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** मुंबईत सुरू असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान गोंदिया विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार श्री. विनोद अग्रवाल यांच्या सततच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. राज्यात अतिरिक्त वर्गखोल्यांसाठी निधीची मर्यादा असतानाही, गोंदिया विधानसभा क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळांमधील जीर्ण आणि निरुपयोगी झालेल्या खोल्यांच्या जागी ३४ अतिरिक्त वर्गखोल्यांना 'समग्र शिक्षा अभियान २०२६-२७' अंतर्गत मंजुरी देण्यात आली आहे. या अतिरिक्त वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ₹५ कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय, गोंदिया विधानसभा क्षेत्रातील इतर जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी सुमारे ₹२ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. हा निर्णय क्षेत्रातील शिक्षण व्यवस्था मजबूत करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. पावसाळी अधिवेशनादरम्यान आमदार श्री. विनोद अग्रवाल यांनी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री श्री. दादा भुसे यांची भेट घेऊन गोंदिया मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांच्या वास्तव परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, अनेक शाळांमध्ये वर्षांपासून अतिरिक्त वर्गखोल्यांची गरज आहे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या, जीर्ण झालेल्या शाळांच्या इमारती आणि पुरेशा खोल्यांचा अभाव यामुळे शिक्षण व्यवस्थेवर परिणाम होत आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मर्यादित संसाधनांमध्ये शिक्षण घ्यावे लागत असल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात अडचणी येत आहेत. बैठकीदरम्यान शिक्षणमंत्र्यांनी स्पष्ट केले की, सध्या राज्यस्तरावर अतिरिक्त वर्गखोल्यांसाठी निधीची उपलब्धता मर्यादित असल्याने अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. तरीही आमदार श्री. विनोद अग्रवाल यांनी गोंदिया मतदारसंघातील विद्यार्थ्यांचे हित सर्वोपरी मानून सातत्याने प्रभावी पाठपुरावा केला आणि क्षेत्राची खरी गरज पुराव्यांसह मंत्र्यांसमोर मांडली. आमदारांचे सततचे प्रयत्न आणि प्रभावी सादरीकरण यामुळे शिक्षण मंत्री श्री. दादा भुसे यांनी गोंदिया मतदारसंघाच्या प्रस्तावाला विशेष प्राधान्य देत समग्र शिक्षा अभियान २०२६-२७ अंतर्गत ३४ अतिरिक्त वर्गखोल्यांना मंजुरी दिली. या खोल्यांच्या बांधकामासाठी ₹५.२७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच क्षेत्रातील इतर शाळांच्या दुरुस्तीसाठी ₹२ कोटींचा अतिरिक्त निधी मंजूर झाला आहे. प्रशासकीय प्रक्रियेनुसार या सर्व प्रस्तावांना केंद्र सरकारकडून अंतिम प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. राज्यात निधीची मर्यादा असतानाही गोंदिया मतदारसंघासाठी ही मंजुरी मिळणे ही मोठी कामगिरी मानली जात आहे. या मंजुरीमुळे क्षेत्रातील हजारो विद्यार्थ्यांना सुरक्षित, आधुनिक आणि उत्तम शैक्षणिक वातावरण उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. (प्रत्येक शाळेसाठी २-२ अतिरिक्त वर्गखोल्या मंजूर) जि.प. उच्च प्राथमिक शाळा रतनारा डांगुर्ली कोचेवाही मोगर्रा हिवराबढ़ेगाव हालबीटोला परसवाड़ा कासा देवरीदतोरा टांडा रावणवाड़ी सतोना खमारी मुली तुमखेड़ा या अतिरिक्त वर्गखोल्यांच्या बांधकामामुळे आणि शाळांच्या दुरुस्तीमुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगले, सुरक्षित आणि सोयीस्कर शैक्षणिक ातावरण मिळेल, तसेच ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाला नवी बळकटी मिळेल. आमदार विनोद अग्रवाल म्हणाले: "शिक्षण हा समाजाच्या विकासाचा सर्वात मजबूत पाया आहे . गोंदिया विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक विद्यार्थ्याला उत्तम शैक्षणिक वातावरण आणि आवश्यक सुविधा ळण्याचा अधिकार आहे. अतिरिक्त वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ₹५.२७ कोटी आणि शाळांच्या दुरुस्तीसाठी ₹२ कोटींची मंजुरी हा क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा आहे. क्षेत्रातील कोणतीही शाळा मूलभूत शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहणार नाही, असा माझा प्रयत्न राहील. शिक्षण आणि विकासासाठी माझा संघर्ष असाच सुरू राहील. शिक्षणाच्या मजबूत पायावरच विकसित गोंदिया आणि विकसित महाराष्ट्राची निर्मिती शक्य आहे." आमदार



श्री. विनोद अग्रवाल यांनी या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार आणि राज्याचे शालेय शिक्षण मंत्री श्री. दादा भु यांचे आभार मानले. राज्य सरकारच्या सहकार्याने गोंदिया विधानसभा क्षेत्रात शिक्षणासह सर्व विकासकामांना सातत्याने गती दिली जात असल्याचे सांगत भविष्यातही जनहिताची कामे प्राधान्याने केली जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या निर्णयाचे परिसरातील शिक्षक, पालक व नागरिकांनी स्वागत केले असून, गोंदिया विधानसभा क्षेत्रातील शिक्षण व्यवस्था मजबूत करण्याच्या दृष्टीने हे एक ऐतिहासिक व दूरदृष्टीचे पाऊल असल्याचे म्हटले आहे. अतिरिक्त वर्गखोल्यांच्या बांधकामासह शाळांच्या दुरुस्तीसाठी मंजूर झालेल्या निधीमुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# ज्ञानवारशाच्या जतनासाठी 'ज्ञानभारतम्' राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण अभियान सुरू

## प्राचीन हस्तलिखितांचे होणार डिजिटायझेशन; नागरिकांना सक्रिय सहभागाचे आवाहन - मा सुनेत्रा पवार

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे**
**विदर्भ संपादिका** , दि. 21 जुलै : भारताच्या हजारो वर्षांच्या समृद्ध ज्ञानपरंपरेचे जतन, संवर्धन आणि पुढील पिढ्यांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने 'ज्ञानभारतम्' राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण अभियान सुरू केले आहे. देशभरातील प्राचीन हस्तलिखितांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी, दस्तऐवजीकरण आणि डिजिटल स्वरूपात संवर्धन करण्याचा या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा उद्देश आहे.

या अभियानांतर्गत भारतभर विखुरलेल्या मौल्यवान हस्तलिखितांची माहिती संकलित करण्यात येणार असून, अध्यात्म, धर्म, तत्त्वज्ञान, आयुर्वेद, गणित, ज्योतिषशास्त्र, नाट्यशास्त्र, रसायनशास्त्र तसेच इतर पारंपरिक ज्ञानशाखांशी संबंधित हस्तलिखितांचा समावेश करण्यात येणार आहे. कागद, ताडपत्र, भूर्जपत्र, कापड किंवा इतर माध्यमांवर लिहिलेल्या हस्तलिखितांची नोंद या सर्वेक्षणाद्वारे केली जाणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे, हस्तलिखितांची मालकी संबंधित व्यक्ती, संस्था, मठ, मंदिर, आश्रम, ग्रंथालय किंवा संशोधन संस्थेकडेच कायम राहणार आहे. शासन केवळ त्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक दस्तऐवजीकरण आणि डिजिटायझेशनची प्रक्रिया राबविणार आहे. त्यामुळे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण होण्यास मोठी मदत होणार आहे.

देशातील नागरिकांनी आपल्या घरात, मठ, मंदिरे, आश्रम, ग्रंथालये, संशोधन संस्था किंवा खाजगी संग्रहात जतन केलेली प्राचीन हस्तलिखिते असल्यास त्यांची माहिती 'Gyan Bharatam' मोबाईल ॲपवर नोंदवून या राष्ट्रीय अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, अनेक दुर्मिळ हस्तलिखितांमध्ये भारतीय ज्ञानपरंपरेचा अमूल्य ठेवा दडलेला असून त्याचे वैज्ञानिक पद्धतीने जतन आणि डिजिटल संवर्धन झाल्यास संशोधक, विद्यार्थी आणि भावी पिढ्यांना त्याचा मोठा लाभ होईल. तसेच भारताच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक वारशाचे जागतिक स्तरावर जतन आणि प्रसार करण्यासही या उपक्रमाची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे.


भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या परिसरातील प्राचीन हस्तलिखितांची माहिती उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी या संकेतस्थळाला भेट देता येईल.



# मेटलाईफ स्टेडियमवर फिफा वर्ल्ड कपचा महेंद्रशेठ घरत यांनी लुटला सहपरिवार आनंद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

क्रिकेटची प्रचंड आवड असणारे महेंद्रशेठ घरत हे फुटबॉलप्रेमीही आहेत, याचा प्रत्यय नुकताच आला. जगभरातील बहुसंख्य क्रीडारसिक टीव्हीवर फुटबॉलचा आनंद घेत असताना महेंद्रशेठ घरत मात्र थेट अमेरिकेत गेले, तिथे न्यू जर्सीतील मेटलाईफ स्टेडियमवर फिफा वर्ल्ड कप फुटबॉलची अंतिम झुंज त्यांनी पाहिली. फुटबॉलचा तो थरार प्रत्यक्ष मैदानावर 'याचि देही याचि डोळा' पाहाण्याची संधी महेंद्रशेठ घरत यांनी साधली तीही कुटुंबासह. जगभरातील फुटबॉलप्रेमींसाठी पर्वणी घेऊन येणारा फिफा वर्ल्ड कप हा दर चार वर्षांनी होतो. तोपर्यंत क्रीडा रसिकांना वाट पाहावी लागते. त्यामुळे जगाचे लक्ष लागलेला फिफा वर्ल्ड कप-२०२६ फायनलचे महेंद्रशेठ घरत हे साक्षीदार ठरले आहेत. त्यांच्यासोबत सौभाग्यवती शुभांगीताई घरत, कुणाल घरत होते. त्यामुळे फुटबॉलच्या अंतिम सामन्याची झुंज प्रत्यक्ष मैदानावर पाहाणारे महेंद्रशेठ घरत हे



आगरी समाजातील बहुआयामी व्यक्तिमत्त्व असल्याचा समाजबांधवांचा समज आहे.अमेरिकेतून दूरध्वनीवरून बोलताना महेंद्रशेठ घरत म्हणाले, "आयुष्यात अनेक स्वप्न आपण पाहत असतो, पण ती पूर्ण होतात असे नाही, मात्र फिफा वर्ल्ड कप फायनल पाहाण्याचे माझे स्वप्न कुटुंबसह पूर्ण झाल्याने मी अत्यानंदात आहे. अंतिम सामन्यातील अर्जेंटिना-स्पेन ही लढत डोळ्यांचे पारणे फेडणारी होती. रसिकांनी खचाखच भरलेल्या मेटलाईफ स्टेडियममधील दोन्ही संघांच्या चाहत्यांच्या चेहऱ्यावरील हाव-भाव पाहाताना अंगावर रोमांच उभे राहिले होते. स्पेन जिंकल्यानंतर त्यांचे चाहते आनंदाने बेहोश झाले होते, तर अर्जेंटिनाच्या चाहत्यांना अश्रू अनावर झाले होते. स्पेनच्या फेरान टोरेसने अवघ्या ३७ सेकंदात केलेला गोल कुणीही विसरू शकत नाही. अर्जेंटिना-स्पेनचा तो आक्रमक खेळ पाहून मन तृप्त झाले आणि अंतिम सामना पाहाण्याचे स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण झाले."महेंद्रशेठ घरत हे जगभ्रमंती करणारे, कलाप्रेमी आणि दानशूर म्हणून प्रसिद्ध आहेतच, परंतु सच्चे पाईक म्हणून ते क्रीडाप्रेमीही तेवढेच आहेत, हे त्यांच्या फुटबॉलवरील प्रेमाने दिसून आले आहे. भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना जगात कुठेही असला तरी ते आवर्जून पाहायला जातात. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कामगार आणि क्रीडा क्षेत्रांत महेंद्रशेठ घरत यांनी आजपर्यंत आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. थोडक्यात ते एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहेत.

# पत्रकार प्रदीप बागवान कडबे यांचा राष्ट्रीय सन्मान

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

नागपूर- जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील किरणापुर येथील बुद्ध ,फुले ,शाहू आंबेडकरी चळवळीच्या बुलंद आवाज, प्रबोधनकार भीम शाहीर तथा पत्रकार प्रदीप बागवान कडबे यांच्या सामाजिक, ग्रंथालय, कला, पत्रकारिते तील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन " डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल फेलोशीप अवार्ड -2026 दिल्ली नुकताच जाहीर करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम दिल्ली येथे १२ डिसेंबर 13 डिसेंबर 2026 रोजी आयोजित अकादमीच्या 42 व्या राष्ट्रीय अधिवेशनात पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक - डॉक्टर एस पी सुमन अक्षर, भारतीय दलित साहित्य अकादमी दिल्ली यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. साहित्यिक गझलकार मधु बावलकर यांनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



# आझाद मैदानात अजून किती वर्ष न्याय मागायचा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे**

प्रत्येक वेळी आश्वासन देणाऱ्या सरकारने एकदा सांगून टाकावे की आम्ही अजून किती वर्ष आंदोलन करायचे असा सवाल करत शेतकरी लोकनेते रमेश हिंदुराव यांनी आझाद मैदानात साखळी उपोषण आंदोलन सुरू केले आहे. भिवंडी येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील कथित भ्रष्टाचार चौकशीच्या मागणीसाठी भाई आकाश निर्मळ आणि रमेश हिंदुराव त्यांच्या सहकाऱ्यांनी आझाद मैदानात साखळी उपोषण सुरू केले. उपविभागीय अभियंता दत्तू गीते ३ वर्ष भिवंडी सार्वजनिक बांधकाम उपविभागात सेवा पूर्ण होऊनही त्यांची बदली का झाली नाही. क कोटी १७ लाख ७२ हजार ६४८ इतक्या रकमेचे वाढीव बिल काढल्याचा आरोप करत संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. याप्रकरणी निष्पक्ष चौकशी करावी अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. आझाद मैदानात न्याय मिळणार आहे की फक्त आश्वासनच असा सवाल रमेश हिंदुराव यांनी केला आहे




# श्रीवर्धन पोलिसांची धडक कारवाई; ३४.९८ लाखांचा चरस जप्त, ६३ वर्षीय आरोपी गजाआड

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी-**

अनिकेत मोहित रायगड जिल्हा पोलीस दलाने अमली पदार्थांविरोधातील मोहिमेला मोठे यश मिळवत श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी परिसरात धडक कारवाई करून तब्बल ६.९९६ किलो (सुमारे ७ किलो) चरस जप्त केला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात या अमली पदार्थाची किंमत ३४ लाख ९८ हजार रुपये इतकी असल्याचा अंदाज असून, या प्रकरणी सादिक इब्राहिम शेखदर (वय ६३, रा. शेखाडी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड) याला अटक करण्यात आली आहे



गोपनीय माहितीच्या आधारे सापळा १८ जुलै २०२६ रोजी श्रीवर्धन पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, शेखाडी परिसरात एक व्यक्ती चरस विक्रीसाठी येणार आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या नेतृत्वाखाली कोंडिवली स्मशानभूमीसमोर सापळा रचण्यात आला. संशयित आरोपी मोटारसायकलवरून येत असताना त्याला अडवून वाहनाची झडती घेण्यात आली. मोटारसायकलच्या डिकीमध्ये २.१४६ किलो चरस आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी अमली पदार्थ, मोबाईल आणि मोटारसायकल जप्त करून आरोपीला ताब्यात घेतले. घरातून आणखी ४.८५० किलो चरस हस्तगत आरोपीविरुद्ध श्रीवर्धन पोलीस ठाण्यात एनडीपीएस (NDPS) कायद्यान्वये गुन्हा क्रमांक १०२/२०२६ दाखल करण्यात आला. पोलीस कोठडीदरम्यान झालेल्या चौकशीत आरोपीने आणखी अमली पदार्थ लपवून ठेवल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी शेखाडी येथील त्याच्या घरात छापा टाकून फायबरच्या बोटीत लपवून ठेवलेले ४.८५० किलो चरस जप्त केले. यामुळे या कारवाईत एकूण ६.९९६ किलो चरस हस्तगत करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत ३४.९८ लाख रुपये आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई ही कारवाई रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथारे तसेच श्रीवर्धन विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, पोलीस नाईक प्रदीप राठोड, अनिल हिवाळे, कुषहरी कदम आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस नाईक प्रदीप राठोड करत आहेत. अमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात श्रीवर्धन पोलिसांनी केलेली ही कारवाई महत्त्वाची मानली जात असून, अशा कारवायांमुळे जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या तस्करीवर आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गुन्हे शाखा कक्ष 3 ची धडक कारवाई फिंगरप्रिंटच्या आधारे घरफोडीचा छडा; झारखंडमधून आरोपी जेरबंद, 8 लाखांची रोकड जप्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल,प्रतिनिधी**

पनवेल शहरातील टिळक रोड परिसरातील एका घरात घरफोडी करून 10 लाख 75 हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या सराईत चोरट्याला पनवेल गुन्हे शाखा कक्ष 3 च्या पथकाने फिंगरप्रिंटच्या आधारे शोधून काढत झारखंडमधून अटक केली आहे. आरोपीकडून 8 लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून त्याने इतरही घरफोडीचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरू आहे.ोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भारती प्रदीप कदम (वय 53) या 14 जुलै 2026 रोजी घराला कुलूप लावून बाहेर गेल्या असताना अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. त्याने घरातील 13.25 तोळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण 10.75 लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. चोरीस गेलेल्या मुद्देमालात शाही हार, पाटल्या, मोठे व छोटे मंगळसूत्र, सोन्याच्या चेन, कानातील दागिने, नथ, अंगठ्या, नेकलेस तसेच रोख रकमेचा समावेश आहे. टनास्थळी फॉरेन्सिक पथक व फिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. तपासादरम्यान घटनास्थळावर मिळालेल्या चान्स प्रिंट (बोटांचे ठसे) नमुन्यांची अंगुलीमुद्रा तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात आली. प्राप्त अहवालाच्या आधारे आरोपीची ओळख विकाशकुमार दिनेश यादव (वय 33), रा. अकदोनी खुर्द, पोस्ट बनियाडीह, पोलीस ठाणे मुखसिल, जि. गिरिडीह (झारखंड) अशी पटली. त्यानंतर तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने गुन्हे शाखा कक्ष-3 च्या पथकाने झारखंड येथे जाऊन आरोपीला अटक केली. त्याच्याकडून 8 लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून, इतर घरफोडीच्या गुन्ह्यांबाबतही त्याची चौकशी सुरू आहे. ही उल्लेखनीय कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्रीमती प्रेरणा कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-3, पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत, सहाय्यक पोलीस निरीक्षक सत्यवान बिले, पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, पोलीस




उपनिरीक्षक प्रसाद पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अनिल पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश शिंदे, पोलीस हवालदार प्रशांत काटकर, प्रमोद राजपूत, अजित पाटील, निलेश पाटील, सागर रसाळ, दिपक डोंगरे, इंद्रजित कानू, रुपेश पाटील, अजिनाथ फुंदे, महिला पोलीस हवालदार हिरकणी पवार, महिला पोलीस नाईक विनया पाटील, पोलीस शिपाई लवकुश शिंगाडे, प्रसाद घरत आणि विक्रांत माळी यांनी पार पाडली.

# कल्पतरू इमारतीजवळ गाढी नदीपात्रात अनोळखी तरुणाचा मृतदेह; पाण्याच्या प्रवाहात वाहून आल्याचा प्राथमिक संशय

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** पनवेल शहरातील कल्पतरू इमारतीलगत असलेल्या उद्यानाजवळील गाढी नदीच्या पात्रात मंगळवारी एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. पुराच्या पाण्याच्या प्रवाहासोबत हा मृतदेह वरच्या भागातून वाहून आला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला असून, मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे..थानिक नागरिकांना नदीपात्रातील कचरा आणि चिखलामध्ये एक मृतदेह पडलेला दिसून आला. त्यांनी तत्काळ याबाबत पनवेल शहर पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि आवश्यक पंचनामा करून मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढण्यात आला. ोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, मृत व्यक्तीचे वय अंदाजे 25 ते 35 वर्षे असून त्याच्या अंगावर मोजकेच कपडे आढळले आहेत. मृताची ओळख अद्याप पटलेली नसून परिसरातील तसेच लगतच्या पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झालेल्या बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींची पडताळणी करण्यात येत आहे. रम्यान, हा मृत्यू पाण्यात बुडाल्यामुळे झाला आहे की त्यामागे अन्य काही कारण अथवा घातपात आहे, याचा तपास पोलीस सर्व बाजूंनी करत आहेत. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून, शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे परिसरात काही काळ नागरिकांची गर्दी झाली होती. पावसाळ्यात नदी-नाल्यांमध्ये पाण्याचा



वेग वाढत असल्याने अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नदीकाठच्या परिसरात सावधगिरी बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

